कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागात विविध स्वरुपाच्या प्रादेशिक अथवा स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. या पाणी पुरवठा योजना राबवितांना देखील शासनाच्या प्रचलित पध्दतीनुसार निविदा प्रक्रिया पार पाडून, कंत्राटदारामार्फत योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जाते.

तथापि, दिनांक ०१.०७.२०१७ पासून राज्यात "वस्तु व सेवा कर" प्रणाली लागू करण्यात आल्यानंतर पाणी पुरवठा योजनांमधील कंत्राटामधील कराच्या भारामध्ये वृध्दी वा घट होत असल्याने कंत्राटाच्या किंमतीत देखील वृध्दी वा घट होऊ शकते. या बाबी विचारात घेऊन, वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या चालू व नवीन कामांच्या कंत्राटांबाबत मार्गदर्शक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

राज्यात वस्तु व सेवा कराची अंमलबजावणी दिनांक ०१ जुलै, २०१७ पासून सुरु झाली आहे. वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अखत्यारित असलेल्या सर्व प्रकारच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीकरिता काढण्यात येणाऱ्या निविदा व कंत्राटांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**१) दिनांक ०१.०७.२०१७ नंतरच्या नवीन कामांच्या कंत्राटांच्या बाबतीत अवलंबावयाची कार्यपध्दती:-**

१.१ दरसूचीतील विविध बाबींचे दर हे वस्तु व सेवा कर वगळून असावेत. अंदाजपत्रके तयार करतांना प्रचलित वस्तु व सेवा कराचा परतावा देण्यासाठी Recapulation Sheet मध्ये त्यांचा समावेश करावा.

१.२ ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतील कामांच्या निविदा वस्तु व सेवा कर वगळून अंदाजपत्रकाच्या किंमतीवर मागविण्यात याव्यात.

१.३ निविदा सादर करतांना दिनांक ०१.०७.२०१७ नंतर लागू झालेल्या वस्तु व सेवा कराचा विचार करुन निविदा सादर करण्याबाबत स्पष्ट निर्देश कंत्राटदारास देण्यात यावेत. त्याबाबतचे कलम निविदेत समाविष्ट असावे.

१.४ कंत्राटदाराने वस्तु व सेवा कर भरणा केल्याच्या पृष्ट्यर्थ परिपूर्ण प्रमाणित कागदपत्रे सादर केल्यानंतर संबंधितांनी अशा प्रस्तावांची व कागदपत्रांची छाननी लेखापाल/सनदी लेखापाल/लेखाधिकारी (जिल्हा पाणी व स्वच्छता कक्ष) यांचेकडून करुन वस्तु व सेवा कराचा परतावा प्रस्ताव प्राप्त झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत अदा करावा.

**२) दिनांक ०१.०७.२०१७ पूर्वी कार्यारंभ आदेश देण्यात आलेल्या कंत्राटांच्या बाबतीत अवलंबावयाची कार्यपध्दती:-**

वस्तु व सेवा कर हा आता अस्तित्वातील सर्व कंत्राटास लागू करण्यात आला असल्याने दिनांक ०१.०७.२०१७ रोजी अस्तित्वातील कंत्राटासाठी कंत्राट शर्तीनुसार विक्री कर/मुल्यवर्धित कर/अबकारी कर/एल.बी.टी./जकात इत्यादींचा समावेश निविदा दरातच असल्याने याबाबत आवश्यक वजावटी करून कंत्राटदाराने वस्तु व सेवा कर शासनास भरणा केल्याबाबत अधिकृत दस्तऐवज/कागदपत्रे सादर केल्यानंतर विधिवत परिगणना करुन परतावा देणे किंवा वसुली याबाबतची कार्यवाही करावी. अशा प्रस्तावांची व कागदपत्रांची छाननी लेखापाल/सनदी लेखापाल/ लेखाधिकारी (जिल्हा पाणी व स्वच्छता कक्ष) यांचेकडून करावी व सक्षम प्राधिकारी यांची मान्यता घ्यावी.

**३) दिनांक ०१.०७.२०१७ पूर्वी स्वीकृत करण्यात आलेली निविदा व दिनांक ०१.०७.२०१७ नंतर कार्यारंभ आदेश देण्यात आलेल्या कंत्राटाच्या बाबतीत अवलंबावयाची कार्यपध्दती:-**

दिनांक ०१.०७.२०१७ पूर्वी स्वीकृत करण्यात आलेली निविदा व दिनांक ०१.०७.२०१७ नंतर कंत्राटाकरिता कार्यारंभ आदेश देण्यात आले असतील, अशा प्रकरणी कंत्राट रद्द करण्यात येऊ नये व कंत्राटाचे काम कंत्राटदारास सुरु करण्याचे निर्देश देण्यात यावेत.

**४)** अ) कंत्राटाच्या किंमतीत करावयाचा बदल हा कंत्राटामध्ये उल्लेख केलेल्या अटी व शर्तीवर अवलंबून असतात. प्रत्येक अटी व शर्ती वेगवगळ्या असतात. वस्तु व सेवा कर प्रणालीच्या पार्श्वभूमीवर कंत्राटाच्या मुल्यांकनासंबंधी विभागानें उपस्थित केलेल्या मुद्यांसंदर्भात वित्त विभागाने परिशिष्ट-अ प्रमाणे स्पष्टीकरण दिले आहे. (**परिशिष्ट-अ** सोबत जोडले आहे.) त्यानुसार कार्यवाही करावी.

ब) तसेच विधी व न्याय विभागाचे अभिप्राय सोबतच्या परिशिष्ट-ब मध्ये दिलेले आहे. या मुद्यांव्यतिरिक्त अन्य प्रकरण उद्भवल्यास अशा प्रकरणी विधी व न्याय विभागाचा सल्ला घेऊन पुढील कार्यवाही करावी. **(परिशिष्ट-ब सोबत जोडले आहे.)**

**५) करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी सर्व पुरवठादार/कंत्राटदार यांच्या देयकांच्या प्रदानातून उद्गम कर वजावट (TDS) करणेबाबत:-**

वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक ५ येथील परिपत्रकातील सूचनांनुसार करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी सर्व पुरवठादार/कंत्राटदार यांच्या देयकांच्या प्रदानातून न चुकता २% उद्गम कर वजावट (TDS) करण्यात यावा.

०२. उपरोक्त सुचनांचे पालन करण्याकरीता क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी संबंधित वस्तु व सेवा कर अधिकाऱ्याशी समन्वय साधून याबाबत दृढीकरण करून घ्यावे व अंमलबजावणीत काही अडचणी आल्यास त्यांचेही निराकरण करून घ्यावे.

०३. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक १०/२०१९/करा-१, दिनांक २७.०१.२०२१ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२१०२१११६५५०४७५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by RAJKUNWAR SANDIP DAFALE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WATER SUPPLY DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=167e8b26eccbbbcdcde7d04cf4bcee02de76e94a47ad503e5395e4b725998c3c, cn=RAJKUNWAR SANDIP DAFALE
Date: 2021.02.15 14:33:59 +05'30'

(राजकुंवर डफ़ळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मंत्री/राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
९. विभागीय आयुक्त (सर्व),
१०.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
११.मिशन संचालक, जल जीवन मिशन, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
१२.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१३.जिल्हाधिकारी (सर्व)
१४.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
१५.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१६.कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१७.उप सचिव, वित्त विभाग/कराधान-१, मंत्रालय, मुंबई.
१८. निवडनस्ती (पापु-०७)

## परिशिष्ट-अ

| अ.क्र. | मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | वस्तु व सेवा कर प्रणालीपूर्वी लागू असलेल्या कर रचनेबाबत माहितीचा कालावधी कोणता राहील? | वस्तु व सेवा कराची अंमलबजावणी दिनांक ०१.०७.२०१७ पासून सुरु झालेली आहे. त्यापूर्वी दिनांक ०१.०४.२००५ ते दिनांक ३०.०६.२०१७ या कालावधीमध्ये महाराष्ट्र मुल्यवर्धित कर (VAT) प्रणाली अस्तित्वात होती. या बाबींचा आणि कार्यकंत्राटांच्या अंमलबजावणीच्या तारखेचा विचार करुन माहितीचा कालावधी ठरविण्यात यावा. |
| २. | वस्तु व सेवा कर प्रणाली दिनांक ०१.०७.२०१७ पासून लागू झाली असल्यामुळे जी.एस.टी. पूर्व प्रणालीमधून Work Contracts बाबतची माहिती किती कालावधी मागे जावून तपासणी आवश्यक आहे? | दिनांक ०१ एप्रिल, २००५ ते ३० जून, २०१७ या कालावधीसाठी महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदा, २००२ मधील तरतुदी Work Contracts बाबत लागू होत्या. कार्यकंत्राटाच्या अंमलबजावणीच्या तारखेचा विचार करून या कालावधीतील माहिती त्या अनुषंगाने तपासणे आवश्यक वाटते. तथापि, संबंधित विभागाने प्रत्येक प्रकरणामध्ये वस्तुस्थितीनुसार निर्णय घ्यावा. |
| ३. | Work Contracts चे Return/Assessment हे त्या कंपनीसाठी एकत्रीत भरले असल्याने या कंत्राटापूरती तपासणी कशी करावी? तसेच कंपनीला मिळत असलेला Set off/Rebate याबाबत तपासणी कशी करावी? | संबंधित विभागाने प्रत्येक प्रकरणामध्ये वस्तुस्थितीनुसार निर्णय घ्यावा. तसेच, त्याची सत्यता सनदी लेखापालाकडून तपासून घेता येऊ शकते.<br>कंपनीला मिळत असलेल्या सेट ऑफ (ITC )बाबत गणना कंत्राटदारांकडून कंत्राटनिहाय घेतली पाहीजे. तसेच सदर सेट ऑफ च्या अनुज्ञेयतेबाबतचा निर्णय, कंत्राटाचे स्वरुप, त्याने स्वीकारलेली कर भरण्याची पध्दत व सेट ऑफ चे महाराष्ट्र मुल्यवर्धित कर नियम, २००५ नुसार असलेले नियम यावर अवलंबून राहील. (यासाठी सदरच्या कंत्राटदाराने महाराष्ट्र मुल्यवर्धित कर नियम, २००५ अन्वये सनदी लेखापालाकडून भरलेले फॉर्म क्र.७०४ नुसार आर्थिक वर्षनिहाय भरलेल्या वार्षिक विवरण पत्राचा उपयोग होईल. तसेच त्याची सत्यता सनदी लेखापालाकडून तपासून घेता येऊ शकते. याबाबत दिनांक २८.११.२०१९ रोजी जलसंपदा विभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकामध्ये दिनांक ०१.०७.२०१७ पूर्वीच्या कंत्राटदारांच्या बाबतीत वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीबाबत विस्तृत उदाहरणासह माहिती दिलेली आहे. |
| ४. | वस्तु व सेवा कर प्रणाली झाल्यानंतर त्याच्या निर्धारण आदेशानुसार वस्तु व सेवा कराची | वस्तु व सेवा कर प्रणालीमध्ये व्यापारी दरमहा कर गणनेबाबत विवरणपत्र GSTR- ३बी, GSTR-०१ दाखल करीत असतो. यामध्ये भरावयाचा कर तसेच घ्यावयाचा ITC याबाबत माहिती |

| | | |
|---|---|---|
| | भरलेली रक्कम तसेच वस्तु व सेवा कराबाबत त्यांना प्राप्त होणारी रक्कम (Input Tax Credit) तपासण्याची काय कार्यपध्दती असावी? | सादर करण्यात येते. तसेच, वार्षिक विवरण पत्र GSTR-९ व ९C दाखल करावे लागते. सनदी लेखापालाकडून तपासणी करून घेण्याचा पर्यायही वापरता येऊ शकतो. |
| ५. | वस्तु व सेवा कर लागू झाल्यानंतर पाईप्समध्ये समाविष्ट असलेल्या कच्चा मालावरील Input Tax Credit कशी तपासावी तसेच करामधील समाविष्ट पाईप्स पुरवठ्यासाठी तयाची परिगणना कशी करावी? | वस्तु व सेवा कर कायद्याच्या कलम १६(२) नुसार ITC घेतांना खालील बाबींची पुर्तता होणे आवश्यक आहे.<br>• पुरवठादार व्यापाऱ्याने बीजक (Tax Invoice) दिलेले पाहिजे.<br>• वस्तुंचा पुरवठा झालेला असला पाहीजे.<br>• पुरवठादाराने विवरण दाखल करून देय कराचे प्रदान केलेले असले पाहीजे.<br>तसेच, वस्तु व सेवा कर कायद्याच्या कलम १६, १७ मधील इतर बाबींची तपासणी करुन ITC बाबत निर्णय घेणे संयुक्तिक राहील. सनदी लेखापालाकडून सदर बाबींची तपासणी करून घेता येते. |
| ६. | तसेच, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर निर्धारण पध्दतीमध्ये काही Fitment Factor निश्चित करता येईल काय? जेणेकरुन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उर्वरीत १६२ योजना करीता एक निश्चित कर निर्धारण पध्दती उपलब्ध होईल. | प्रत्येक कार्यकंत्राटाच्या अटी व शर्ती, संबंधीत कामाचे स्वरुप वेगवेगळे असतात. त्यामुळे सर्व योजनांसाठी एकच कर निर्धारणपध्दती लागू करणे शक्य होणार नाही.<br>तथापि, वस्तू व सेवा कर कायद्याच्या अंमलबजावणीमुळे कंत्राटाच्या किंमतीमध्ये वाढ करणेबाबत जर पाणी पुरवठा विभागाने धोरणात्मक निर्णय घेतला असेल तर विभागाने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.<br>• सर्वप्रथम दिनांक ०१.०७.२०१७ रोजी शिल्लक असलेल्या कार्यकंत्राटाची किंमत निश्चित करण्यात यावी.<br>• दिनांक ०१.०७.२०१७ रोजी शिल्लक कार्यकंत्राटावर (देय) मुल्यवर्धित कराचा बोजा किती असता त्याची परिगणना करावी. (वस्तु व सेवा कर कायदा लागू झाला नाही असे गृहीत धरुन) तसेच सदर शिल्लक असलेल्या कार्यकंत्राटाकरिता खरेदी अथवा विक्रीवर अंतर्भुत असणारे इतर कर जसे मुल्यवर्धित कर, उत्पादन शुल्क (Excise Duty), केंद्रीय विक्रीकर, सीमा शुल्क, सेवा कर, एलबीटी, जकात इ. कराचा बोजा किती आला असता याचीसुध्दा परिगणना करावी. उपरोक्त परिगणना कंत्राटदाराने सनदी लेखाकडून (CA) प्रमाणित करून सादर करणे |

| | | |
|---|---|---|
| | | आवश्यक आहे.<br>• अशाप्रकारे परिगणना केलेला एकूण करभार दिनांक ०१.०७.२०१७ रोजी शिल्लक असलेल्या कार्यकंत्राटाच्या किंमतीतून वजा करावा व शिल्लक नक्त (Net) कंत्राटाच्या किंमतीसाठी (Net Contract Price) पुरवणी करारनामा (Supplementary Agreement) करण्यात यावा. सदर आलेल्या नक्त कंत्राटाच्या किंमतीवर (Net Contract Price) लागू असलेला वस्तू व सेवा कर (GST) अदा करण्यात यावा.<br>• वरीलप्रमाणे परिगणना करतांना कार्यकंत्राटदाराने सादर करावयाची परिगणना सनदी लेखापालाने (CA) प्रमाणित केलेली असावी. |

RAJKUNWAR SANDIP DAFALE

Digitally signed by RAJKUNWAR SANDIP DAFALE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WATER SUPPLY DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=167e8b26eccbbbcdcde7d04cf4bcee02de76e94a47ad503e5395e4b725998c3c, cn=RAJKUNWAR SANDIP DAFALE
Date: 2021.02.15 14:34:43 +05'30'

(राजकुंवर डफ़ळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट-ब

| अ.क्र. | मुद्दा | विधी व न्याय विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|
| १. | कंत्राटदाराने कंत्राट घेतांना G.S.T. लागण्यापूर्वी अबकारी कर वगळून पाईप्सची किंमत लावून कंत्राट घेतले आहे. त्यानंतर कंत्राटदारास पाईप पुरविणाऱ्या कंपनीने दिनांक ०१.०७.२०१७ पासून केंद्र शासनाने त्यानंतर G.S.T. लागू केला असल्याने व यापूर्वी ज्या शासकीय योजनांसाठीचा PAC प्रमाणपत्राच्या आधारे अबकारी कर लावला जात नव्हता. तथापि, G.S.T. मध्ये अशी कोणत्याही तरतूद नसल्याने त्यामुळे कंत्राटदारास पाईप्स खरेदीच्यावेळी तसेच कंत्राटदाराच्या देयकामध्ये समाविष्ट अन्य बाबींवर ही कंत्राटदारास पाईप्स खरेदीच्यावेळी तसेच कंत्राटदाराच्या देयकामध्ये समाविष्ट अन्य बाबींवर ही G.S.T. रक्कम शासनाकडून कंत्राटदारास देय होत असे वाटते. तसेच अशी G.S.T. अदा केल्यास प्रशासकीय मान्यतेच्या मुळ मंजूर किंमतीपेक्षा अधिक रक्कम ही अदा करण्यात येणार नाही. त्यामुळे कंत्राटदारास G.S.T. रक्कम अदा करण्यात यावी किंवा कसे याबाबत वित्त विभागाच्या अभिप्रायास अनुसरून विधी व न्याय विभागाने अभिप्राय दिले आहे. | In view of the instructions issued by the Finance Department vide Circular dated 11.09.2017, the Water Supply & Sanitation Department has forwarded the sample copy of Contract Agreement for S.R. Karanja (Ram) village water supply scheme. Tq. Balapur, Dist. Akola executed between the Executive Engineer, Rural Water Supply Division Zilla Parishad Akola and Shri. Shyam Mahore 'Contractor' for providing and Construction Head Works, Switch House Pumping Machinery, Rising Main, RCC ESR/G Distribution System, Miscellaneous Works, etc., with the request to tender opinion whether the amount of contract increased by the applicability of the Goods & Services Tax Act would be payable to the contractor under the aforesaid Contract Agreement.<br>After careful perusal of the note and the papers in the file, it appears that, work order of the aforesaid Contract was given to Contractor on dated 23.06.2017. It further appears that, as per Central Excise Notification No.12/2012 dated 17.03.2012, the District Collector, Akola vide its order dated 29.06.2017, had granted certificate for exemption of Excise Duty on the purchase of pipes for the said works. It further appears that there is no clause in the aforesaid Contract Agreement regarding price variation due to variation in taxes. However, in a letter dated 15.07.2019 addressed to Deputy Secretary of the Concerned Department, the Executive Engineer, Rural Water Supply Division Zilla Parishad, Akola specifically stated that, "कंत्राटदाराने निविदेत पाईपची किंमत अबकारी कर सोडून भरली असल्यामुळे व मा. जिल्हाधिकारी, अकोला यांनी अबकारी कर सुट दिलेली असल्यामुळे अबकरातील फरक आणि VAT ऐवजी GST लागलेला असल्यामुळे त्यातील फरक देय ठरते असे या कार्यालयाचे मत आहे."<br>Considering the above, a reasonable inference flows that in the cost of pipes/material the amount of Excise Duty was not included as |

| | | |
|---|---|---|
| | | the same was exempted at the relevant time. It is evident that, the cost of the contract has been increased by applicability of the Goods and Service Tax Act (GST) by the statutory provisions and the said cost has been paid by the Contractor. Therefore, in the light of the aforesaid facts, the Contractor is entitled for getting reimbursement of such variation of price under the contract in question. |

RAJKUNWAR SANDIP DAFALE

Digitally signed by RAJKUNWAR SANDIP DAFALE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WATER SUPPLY DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=167e8b26eccbbbcdcde7d04cf4bcee02de76e94a47ad503e5395e4b725998c3c, cn=RAJKUNWAR SANDIP DAFALE
Date: 2021.02.15 14:35:26 +05'30'

(राजकुंवर डफ़ळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या तांत्रिक/ प्रशासकीय/ अंमलबजावणी अधिकारांबाबत

**महाराष्ट्र शासन**

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः जजीमि-२०१९/प्र.क्र.१३८(भाग-२)/पापु-१०**

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय इमारत, मुंबई ४०० ००१
तारीख: १० मार्च, २०२१

वाचा :-

१) **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः** ग्रापाधो -२०१८/ प्र.क्र.१७१/ पापु-०७, दि.११.०२.२०१९

२) **शासन निर्णय क्रमांकः पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः जजीमि ०६२०/ प्र.क्र.२०/ पापु ०७,दि.३०.०६.२०२०**

३) **शासन निर्णय क्रमांकः पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग , क्रमांकः जजमि २०२०/प्र.क्र.१३८/ पापु १० (०७), दि.०४.०९.२०२०**

प्रस्तावना -

केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची पुनर्रचना करुन नवीन जल जीवन मिशनची सुरवात केली आहे. राज्यात जल जीवन मिशन राबविण्याकरीता सविस्तर मार्गदर्शक सूचना संदर्भिय क्र.३ दि.०४.०९.२०२० च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी योजनांच्या तांत्रिक/ प्रशासकीय/ अंमलबजावणीचे अधिकार जल जीवन मिशनशी सुसंगत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

## शासन निर्णय :-

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी संदर्भिय क्र.१ येथील दि.११.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये तांत्रिक/ प्रशासकीय/ अंमलबजावणीचे/ निविदा स्वीकृतीचे अधिकार विविध स्तरावरील यंत्रणांना प्रदान करण्यात आले आहेत. सदर अधिकार जल जीवन मिशनमध्ये पुनर्गठित केलेल्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनशी सुसंगत करुन पुढीलप्रमाणे प्रदान करण्यात येत आहेत. तसेच शासन निर्णय दि.०४.०९.२०२० अन्वये राज्यातील पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीचे संपुर्ण अधिकार राज्य पाणी व स्वच्छता मिशनला देण्यात आले आहेत. यामध्ये सुधारणा करण्यात

येऊन तांत्रिक/प्रशासकीय/ अंमलबजावणी/ निविदा स्वीकृतीचे अधिकार पुढीलप्रमाणे प्रदान करण्यात येत आहेत.

**१) तांत्रिक मान्यतेचे अधिकार-**

खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे तांत्रिक मान्यता देण्यास संबंधित अधिकारी सक्षम राहतील.

| अ.क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | तांत्रिक मान्यतेचे अधिकार | | |
|---|---|---|---|---|
| | | **कार्यकारी अभियंता** | **अधिक्षक अभियंता** | **मुख्य अभियंता** |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु २.०० कोटी पर्यंत सर्व | रू. २.०० कोटी ते रू. ५.०० कोटी पर्यंत | रु.५.०० कोटी वरील सर्व |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु २.०० कोटी पर्यंत सर्व | रू. २.०० कोटी ते रू. ५.०० कोटी पर्यंत | रु.५.०० कोटी वरील सर्व |

**२) प्रशासकीय मान्यतेचे अधिकार-**

| **अ.क्र.** | **ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार** | **प्रशासकीय मान्यतेचे अधिकार (दरडोई खर्चाच्या निकषात बसणाऱ्या)** | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्रामपंचायत | जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन | शासन स्तरावर |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रू.१५लक्ष पर्यंत *गावांतर्गत कामे | रू.१५.०० लक्ष ते रू ५.०० कोटी पर्यंत | रु.५.००कोटी वरील सर्व |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | निरंक | रू ५.०० कोटी पर्यंत | रु.५.००कोटी वरील सर्व |

(i) * रु.१५ लक्ष पर्यंत गावांतर्गत घ्यावयाची कामे यामध्ये रु.१५.०० लक्ष पर्यंतची गावासाठी स्वतंत्र पाणी पुरवठा योजना त्याचप्रमाणे घरगुती नळ जोडणी (FHTC) तसेच सुधारणात्मक पुनर्जोडणीची कामे समाविष्ट असतील.

(ii) जल जीवन मिशन अंतर्गत राज्यस्तरीय योजना मंजुरी समितीची मान्यता प्राप्त वार्षिक कृती आराखड्यामध्ये समाविष्ट असलेल्या योजनाच जल जीवन मिशनमधून राबविण्यात येतील.

(iii) जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनस्तरावरील जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती रु.५.०० कोटी मर्यादेपर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करेल. प्रशासकीय मान्यतेचे आदेश सह अध्यक्ष, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यास्तरावरुन निर्गमित करण्यात यावेत.

(iv) जल जीवन मिशनअंतर्गत पाणी पुरवठा योजनांना सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक तपासणी व तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतरच योजना प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यात याव्यात. प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करताना त्यासोबत योजनांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR), अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेच्या आदेशाची प्रत सादर करावी.

(v) रु.५.०० कोटी पेक्षा अधिक किंमतीच्या योजनांचे प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयांकडून राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडे पाठविण्यात येतील.

(vi) रु.५.०० कोटी ते रु.३०.०० कोटी पर्यंतच्या योजनांची छाननी करण्यासाठी मिशन संचालक, जल जीवन मिशन यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे राज्य पाणी व स्वच्छता मिशनची तांत्रिक छाननीसाठी उप समिती राहील.

१) **अध्यक्ष - मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन.**
२) सदस्य - मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
३) सदस्य - मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (संबंधित प्रादेशिक विभाग).
४) सदस्य - प्रकल्प व्यवस्थापक (वित्त), जल जीवन मिशन, राज्य पाणी व स्वच्छता मिशन.
५) सदस्य - कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग (संबंधित जिल्हा परिषद).
६) सदस्य - उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (संबंधित प्रादेशिक विभाग).
७) सदस्य सचिव - कार्यकारी अभियंता, राज्य पाणी व स्वच्छता मिशन.

**रु.५.०० कोटी वरील योजनांना राज्य पाणी व स्वच्छता मिशनस्तरावरील समितीने शिफारस केल्यानंतर शासनामार्फत प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.**

(vii) रु.३०.०० कोटी पेक्षा अधिक किंमतीच्या योजनांची छाननी करण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पाणी व स्वच्छता मिशनची खालीलप्रमाणे तांत्रिक छाननीसाठी उप समिती असेल.

१) **अध्यक्ष - अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.**
२) सदस्य - सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
३) सदस्य - सह सचिव (जल जीवन मिशन), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
४) सदस्य - संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा.
५) सदस्य - प्रकल्प व्यवस्थापक (वित्त), जल जीवन मिशन, राज्य पाणी व स्वच्छता मिशन.
६) सदस्य - मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
७) सदस्य - मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (संबंधित प्रादेशिक विभाग).
८) सदस्य सचिव - मिशन संचालक,राज्य पाणी व स्वच्छता मिशन.

**रु.३०.०० कोटी वरील योजनांना राज्य पाणी व स्वच्छता मिशनस्तरावरील उपरोक्त समितीने शिफारस केल्यानंतर शासनामार्फत प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.**

(viii) दरडोई खर्चाच्या निकषात न बसणारे प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी आल्यानंतर या प्रस्तावांवर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्या स्तरावरील समितीमार्फत कार्यवाही करण्यात येईल.

**३) क्षेत्रिय स्तरावरील अंमलबजावणी**

| **अ.क्र.** | **ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार** | **अंमलबजावणी अधिकार** | | |
|---|---|---|---|---|
| | | **ग्रामपंचायत** | **जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन** | **महाराष्ट्र जीवन प्राधिकरण** |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु.१५ लक्ष पर्यंत | रु.१५.०० लक्ष ते रु.५.०० कोटी पर्यंत | रु.५.०० कोटी वरील सर्व |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | निरंक | रु.५.०० कोटी पर्यंत | रु.५.०० कोटी वरील सर्व |

४) **निविदा स्वीकृतीचे अधिकार-** खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या निविदा स्वीकृतीचे अधिकार खालीलप्रमाणे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार** | **निविदा स्वीकृतीचे अधिकार (अंदाजपत्रकीय दराने प्राप्त होणाऱ्या निविदांसाठी)** | | |
|---|---|---|---|---|
| | | **ग्रामपंचायत** | **मुख्य कार्यकारी अधिकारी** | **महाराष्ट्र जीवन प्राधिकरण** |
| १ | २ | **३** | **४** | **५** |
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु.१५ लक्ष पर्यंत | रु.१५.०० लक्ष ते रु.५.०० कोटी पर्यंत | रु.५.०० कोटी वरील सर्व |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | निरंक | रु.५.०० कोटी पर्यंत | रु.५.०० कोटी वरील सर्व |

i. अंदाजपत्रकीय दरापेक्षा अधिक रकमेच्या निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदा स्वीकृतीसाठी शासनाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक राहील.

ii. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या निविदा स्वीकृतीसाठी प्रचलित कार्यपध्दती कायम राहील

iii. जल जीवन मिशन अंतर्गत मंजुर झालेल्या पाणी पुरवठा योजनांसाठी सदर शासन निर्णय लागू राहील. तथापि, ज्या योजनांची निविदा स्वीकृती या शासन निर्णयापूर्वीच झालेली असेल अशा योजनांसाठी या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहणार नाहीत.

०२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ.क्र.५९/व्यय-३, दि.१०.०२.२०२१ अन्वये प्राप्त अभिप्राय विचारात घेऊन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०३०९१६४१०९१९२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Kundlik Puri

Digitally signed by Pravin Kundlik Puri
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=deec47ad25fc7d88d8920ac82eeb80566d6602e538e92d0aa7206eb36e7aa29c, cn=Pravin Kundlik Puri
Date: 2021.03.10 18:24:42 +05'30'

**(प्रवीण पुरी)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधीमंडळ सचिवालय, मुंबई
७. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधीमंडळ सचिवालय, मुंबई
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मा.अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. मा.अपर मुख्य सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय्य सहायक, मंत्रालय, मुंबई.
११. विभागीय आयुक्त (सर्व).
१२. जिल्हाधिकारी (सर्व).
१३. मिशन संचालक, जल जीवन मिशन (राज्य पाणी व स्वच्छता मिशन), बेलापूर, नवी मुंबई.
१४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१५. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७. उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी (सर्व), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. मुख्य अभियंता/ अधिक्षक अभियंता/ कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१९. प्रकल्प संचालक, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद (सर्व)

२०. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)

२१. निवडनस्ती, कार्यासन- पापु १०/पापु-०७

**जल जीवन मिशन अंतर्गत शाश्वत कार्यात्मक नळ जोडणी देण्यासाठी पाण्याचा ताण असलेल्या कालावधीत कॅच द रेन (Catch the Rain) तत्वावर पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता राज्यभरात "स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजना" राबविण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-२०२१/प्र.क्र.१७/पापु-०७**

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, क्रॉफर्ड मार्केट जवळ, नविन मंत्रालय इमारत, मुंबई - ४०० ००१
तारीख: २० मे, २०२१

वाचा :-

**शासन निर्णय क्रमांकः** जजमि २०१९/प्र.क्र.१३८/पापु-१०(०७), दि. ०४ सप्टेंबर, २०२०

प्रस्तावना :-

सध्या राज्यात केंद्र शासन व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने जल जीवन मिशन कार्यक्रम सन २०२०-२०२४ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत "हर घर नल से जल" या उद्देशाने ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना वैयक्तिक कार्यात्मक नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. या कार्यक्रमाच्या उद्देशानुसार राज्यातील ग्रामीण भागात नळ पाणी पुरवठा योजनेची कामे हाती घेण्यात आली आहेत अथवा प्रस्तावित आहेत. तथापि, राज्यातील अनेक गावे/ वाड्या, दुर्गम डोंगराळ भाग, आदिवासी क्षेत्र हे उन्हाळ्यात पाण्याचा ताण असलेल्या क्षेत्रात असल्यामुळे या गावांमध्ये कार्यात्मक कुटुंब नळ जोडणी द्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी पर्यायी उपाय योजनांची आवश्यकता आहे.

राज्यामध्ये सन २००२ ते २००९ या कालावधीत शिवकालीन पाणी साठवण योजना राबविण्यात आली आहे. या योजनेंतर्गत उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची समस्या असलेल्या गावांमध्ये पावसाचे पाणी साठवणूक करण्याच्या व स्रोत बळकटीकरणाच्या योजना हाती घेण्यात आल्या होत्या. या योजनेअंतर्गत हाती घेण्यात आलेल्या उपाययोजनांद्वारे अनेक गावांच्या उन्हाळ्यातील पिण्याच्या पाण्याच्या समस्या यशस्वीपणे सोडविण्यात आल्या आहेत. याच धर्तीवर केंद्र शासनाद्वारे इतर राज्यात देखील स्रोत बळकटीकरणाच्या योजना हाती घेण्यास प्रोत्साहन दिले आहे.

राज्याची विशिष्ट भौगोलिक व भुस्तरीय रचना तसेच पर्जन्यमानात असलेली मोठी तफावत या बाबींमुळे राज्याचे सुमारे ४२.५ टक्के क्षेत्र (१७३ तालुके) हे अवर्षण प्रवण क्षेत्र आहे. राज्याची भुस्तरीय रचना (Geology), भौगोलिक परिस्थिती व भुपृष्ठीय पाण्याचे स्रोत यामुळे ग्रामीण भागातील

सुमारे ८०% पेक्षा अधिक योजना दरवर्षी पुनर्भरीत होणाऱ्या भुजलावर आधारीत आहेत. भुस्तरीय रचनेमुळे अनेक भागात भूजल उपलब्धता देखील हंगामी असते (पावसाळा व हिवाळा). त्यामुळे राज्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा ताण (Water Stress) निर्माण होतो व त्यामुळे अनेक गावे वाड्या-वस्त्यांना अशा कालावधीत व लीन कालावधीत (Lean Period) पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेची समस्या दिसून येते. अशा गावांना पुरक उपाय योजनांद्वारे तात्पुरता पाणी पुरवठा करण्यात येतो. तथापि, यामुळे शाश्वत पाणी पुरवठ्याचा उद्देश साध्य होत नाही किंवा पाण्याचा ताण असलेल्या भागातील ग्रामीण जनतेस नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही. राज्यामध्ये पडणाऱ्या एकूण पावसाच्या पाण्यापैकी सुमारे ७०% पाणी हे वाहून जाणारे पाणी (Surface Run-off) व बाष्पीभवन या माध्यमातून निघून जाते. या वाहून जाणाऱ्या पाण्याची उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचा ताण असलेल्या गावांची समस्या सोडविण्याकरिता "कॅच द रेन (Catch The Rain)" या तत्वावर वापर करण्याची आवश्यकता आहे.

उन्हाळ्यात सुमारे ३ महिने आणि विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे पिण्याच्या पाण्याची समस्या असणाऱ्या अशा गावे /वाड्या/वस्त्यांना पिण्याचे पाणी साठवणूक करुन वापरण्यासाठी साठवण टाकी सारख्या उपाय योजना राबविण्याकरिता धोरण निश्चित करण्यासाठी संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने दिलेल्या अहवालानुसार, राज्यात यापुर्वी राबविण्यात आलेल्या शिवकालीन पाणी साठवण योजना तसेच जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत पाण्याचा ताण असलेल्या गावे/वाड्या-वस्त्यांकरिता उन्हाळ्यात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी राबविण्यात आलेल्या विविध पद्धतीच्या साठवण टाक्यांच्या योजनांप्रमाणे उपाययोजना हाती घेण्याची शिफारस करण्यात आली आहे. या समितीच्या अहवालास अनुसरुन, जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत उन्हाळ्यात पाण्याचा ताण जाणवणाऱ्या गावांना तसेच हंगामी भूजल उपलब्धता असलेल्या छोट्या गावे, वाड्या-वस्त्यांना उन्हाळ्यात शाश्वतरित्या पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी पाऊस पाणी संकलनासाठी साठवण टाक्यांच्या योजना तसेच स्त्रोत बळकटीकरणाच्या योजना हाती घेऊन शिवकालीन पाणी साठवण योजना सुधारीत स्वरुपात पुनर्जिवित करण्याचे प्रस्तावित आहे. यापैकी स्त्रोत बळकटीकरणासाठी हाती घ्यावयाच्या उपाय योजनांसाठी स्वतंत्र मार्गदर्शक सुचना प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. उन्हाळ्यात पाण्याचा ताण जाणवणाऱ्या गावे, वाड्यांकरिता पाऊस पाणी संकलनासाठी साठवण टाक्यांच्या उपाययोजना राबविण्याकरिता मान्यता देण्याची व अंमलबजावणीकरिता मार्गदर्शक सुचना प्रसिद्ध करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

उन्हाळ्यातील ३ ते ४ महिने आणि अन्य कारणांमुळे काही विशिष्ट कालावधीत पाण्याचा ताण (Water Stress) जाणवणाऱ्या राज्यातील गावे / वाड्या-वस्त्या यांच्याकरिता पाण्याची साठवणूक करुन ताण (Stress Period) असलेल्या कालावधीत पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत उपाययोजना राबविण्याकरिता "स्व.मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी

साठवण योजना" या नावाने सर्वसमावेशक योजना राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सुचना पुढीलप्रमाणे आहेत :-

- स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजनेंतर्गत प्रस्तावित योजना ह्या प्रामुख्याने प्रत्यक्ष पाण्याचा ताण असलेल्या कालावधी करिता आहेत.
- या उपाययोजना मुळ योजनेस पुरक योजना म्हणून घेण्यात याव्यात.
- योजनांकरीता स्रोत म्हणुन पावसाचे पाणी, झरे, पाझर इत्यादी घेणे आवश्यक राहील. पुर्णपणे भूजल आधारीत योजना घेण्यात येऊ नयेत.
- सरासरी किंवा त्यापेक्षा कमी पर्ज्यन्यमान असलेल्या क्षेत्रात भूजल आधारीत योजना करणे आवश्यक असल्यास, ओढा किंवा नदी काठच्या सार्वजनिक विहिरीतून पावसाळ्यादरम्यान वा लगतच्या कालावधीतून पाझरणाऱ्या पाण्यातून साठवण टाकी भरली जाईल अशी व्यवस्था करण्यात यावी.
- साठवून ठेवलेले पाणी पिण्यास वापरण्याकरीता ग्रामस्थांची जनजागृती व क्षमता बांधणी मोठ्या प्रमाणात व सातत्याने करावी.
- या योजना प्रामुख्याने अतिदुर्गम क्षेत्रातील, डोंगराळ भागातील, अदिवासी क्षेत्रातील तसेच DPAP व पाण्याचा ताण असलेल्या क्षेत्रातील गावांकरिता घेण्यात याव्यात.

**स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या उपाययोजना -**

१) मेटॅलीक पद्धतीच्या साठवण टाक्या.
२) फेरोसिमेंट अथवा आर.सी.सी. सिमेंटच्या साठवण टाक्या.
३) जलकुंभ / साठवण टाक्या.
४) पावसाचे पाणी / झरा आधारीत साठवण तलाव (पाणी तळे).
५) फेरोसिमेंटच्या छोट्या टाक्या (पागोळी विहिर).
६) बंद असलेली भुमीगत साठवण टाकी.

वरिल अ.क्र.१ ते ४ येथे दर्शविण्यात आलेल्या उपाययोजना ह्या साधारणत: किमान ५० ते कमाल ५०० पर्यंत लोकसंख्या असलेल्या गावे/ वाड्या/ वस्त्यांकरिता घेण्यात याव्यात. ५० पेक्षा कमी लोकसंख्या असलेली गावे/ वाड्या/ वस्त्यांमध्ये शक्यतो अ.क्र. ५ व ६ येथे नमूद केलेल्या उपाययोजना हाती घ्याव्यात. हाती घ्यावयाच्या उपाययोजनांमधील पाण्याच्या टाकीची क्षमता ही संबंधीत गाव/ वाडी/ वस्तीच्या लोकसंख्येवर आधारित असावी.

पावसाळ्यामध्ये सहजपणे उपलब्ध होणारे शुद्ध व स्वच्छ पाणी, उन्हाळ्यापर्यंत सामुदायिक साठवण टाकीत / जलकुंभात साठवूण ठेऊन, दैनंदीन वितरणाच्या टाकीद्वारे अथवा थेट अस्तित्वातील वितरण व्यवस्थेस जोडून, निर्जंतुक करुन, पाण्याचा ताण असलेल्या कालावधीमध्ये,

लोकसहभागातून उपलब्ध करुन देण्यात यावे. या प्रकारच्या योजना हाती घेण्यासाठी योजनांचे सविस्तर विवरण स्वतंत्र परिशिष्ट (परिशिष्ट १, २, ३ व ४) मध्ये देण्यात आले आहेत.

पाण्याचा ताण असलेल्या गावाच्या गरजेनुसार साठवण तलाव करण्याची आवश्यकता असल्यास योग्य त्या आकारमानाचा साठवण तलाव घेऊन पावसाचे पाणी किंवा झरा या स्त्रोतातून त्यात पाणी साठवून ठेवण्यात यावे. अशा तलावांमध्ये फुडग्रेड प्रतीच्या पॉलीइथीलीन पेपरचे आच्छादन टाकण्यात यावे. या बाबतच्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र मार्गदर्शक सुचना देण्यात येतील.

**स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजनेंतर्गत गाव निवडीचे निकष -**

१) तहसीलदार यांनी प्रमाणित केलेली टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणारी गावे /वाड्या/ वस्त्या.

२) भौगोलिक दृष्टीने डोंगराळ / दुर्गम / अतिदुर्गम भागातील असे जिल्हा परिषदेतील भूवैज्ञानिक आणि गट विकास अधिकारी यांनी संयुक्तपणे प्रमाणित केलेली गावे किंवा वाड्या-वस्त्या.

३) आदिवासी उप-योजना (TSP) तालुक्यातील गावे.

४) याव्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी संयुक्तपणे प्रमाणित केलेली विशिष्ट गावे, वाड्या/वस्त्या, तांडे.

**योजनेसाठी जागेची उपलब्धता -**

योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक जागा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची राहील. जागेची उपलब्धता निश्चित झाल्यानंतरच योजनेची अंमलबजावणी हाती घेण्यात यावी.

**योजनेची तांत्रिक मान्यता -**

स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या उपाययोजनांकरीता पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडून तांत्रिक मान्यता देण्यात येईल.

| अ.क्र. | पदनाम | तांत्रिक मान्यतेची क्षमता |
|---|---|---|
| १ | उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद | रु. १५.०० लक्ष पर्यंत |
| २ | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद | रु. १५.०० लक्ष हून अधिक |

**योजनेची प्रशासकीय मान्यता -**

स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या उपाययोजनांकरीता पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

| अ.क्र. | पदनाम | प्रशासकीय मान्यतेची क्षमता |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत | रु. १५.०० लक्ष पर्यंत |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | रु. १५.०० लक्ष हून अधिक |

(१) या उपाययोजना हाती घेण्यासाठी निधीच्या उपलब्धतेनुसार संबंधित यंत्रणेने प्रशासकीय मान्यतेबाबत कार्यवाही करावी. निधी उपलब्धतेबाबतची सविस्तर कार्यवाही स्वतंत्रपणे "निधीची उपलब्धता" या घटकाखाली दर्शविली आहे.

(२) ग्रामपंचायत स्तरावर प्रशासकीय मान्यता द्यावयाच्या योजनांच्या बाबतीत प्रशासकीय मान्यतेचे आदेश ग्राम विकास अधिकारी (ग्रामसेवक) व सरपंच यांच्या संयुक्त स्वाक्षरीने निर्गमित करण्यात यावेत. जिल्हा परिषद स्तरावर प्रशासकीय मान्यता दिलेल्या योजनांच्या बाबतीत प्रशासकीय मान्यतेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करावेत.

(३) या कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या उपाययोजना अन्य कोणत्याही कार्यक्रमामध्ये समाविष्ट असणार नाहीत, याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय यंत्रणेची असेल.

(४) या प्रकारच्या उपाययोजना ह्या मूळ योजनेला स्वतंत्र पुरक योजना (Stand Alone Scheme) म्हणून करण्यात येत असल्याने या पुरक भागाकरिता दरडोई निकष विचारात घेण्याची आवश्यकता नाही. तसेच या पुरक भागाचे वेगळे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे व तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यता वर नमूद केलेल्या अधिकारानुसार देण्यात यावी.

(५) या कार्यक्रमांतर्गत नमूद उपाययोजनांना सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतरच प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करताना उपाययोजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल, अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेच्या आदेशाची प्रत सादर करणे अनिवार्य राहील.

**योजनांची अंमलबजावणी -**

स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संबंधित सक्षम प्राधिकरणाला राहतील.

| अ.क्र. | पदनाम | अंमलबजावणीचे अधिकार |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत | रु. १५.०० लक्ष पर्यंत |
| २ | जिल्हा परिषद | रु. १५.०० लक्ष हून अधिक |

या उपक्रमान्वये प्रस्तावित योजनांची अंमलबजावणी,जल जीवन कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार वरील सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत करण्यात येईल.

१. या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी पात्र गावे/ वाड्या/ वस्त्या, तांडे इत्यादींची संपूर्ण गट निहाय (Block-wise) यादी तयार करावी. त्यास ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची मान्यता घेण्यात यावी. तदनंतर निवड केलेल्या गावांची यादी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील तसेच पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा समितीमध्ये मंजूर करुन घेण्यात यावी. या गावांचा समावेश वार्षिक कृती आराखड्यामध्ये करण्यात यावा. या उपाययोजनांची अंमलबजावणी करणे फारच गरजेचे असल्यास, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा समितीच्या मान्यतेने उपाययोजना हाती घेण्यात याव्यात. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समितीची तसेच पुढील मान्यता ह्या कार्योत्तर घेण्यात याव्यात.

२. योजनांच्या पाण्यासाठीचा स्रोत म्हणून पावसाचे पाणी, झरे, पाझर इत्यादींना प्राधान्य देण्यात यावे. सरासरी किंवा त्यापेक्षा कमी पर्जन्यमान असलेल्या क्षेत्रात भूजल आधारीत योजना करणे आवश्यक असल्यास, ओढा किंवा नदी काठच्या सार्वजनिक विहिरीतून पावसाळ्यादरम्यान वा लगतच्या कालावधीतून साठवण टाकी भरली जाईल अशी व्यवस्था करण्यात यावी.

३. भूजल आधारीत स्रोत असलेल्या योजनेतील स्रोतांची, योजना हाती घेण्यापुर्वी तसेच अंमलबजावणीनंतर, नियमित पाणी गुणवत्ता तपासण्यात यावी. सर्व योजनांमध्ये निर्जंतुकीकरणाची व्यवस्था करण्यात यावी.

४. जल जीवन कार्यक्रमाचा उद्देश हर घर नल से जल असा असल्यामुळे घरगुती नळ जोडण्या देणे अपेक्षित आहे. त्याकरिता साठवण टाक्या / जलकुंभातील पाण्याच्या वितरणासाठी या योजना अस्तित्वातील वितरण व्यवस्थेस जोडण्यात याव्यात अथवा दैनंदीन वितरणाच्या टाकीस वितरण व्यवस्थेस जोडण्यात याव्या व त्याद्वारे उन्हाळ्यात पाणी वितरीत करण्यात यावे. आवश्यकता असल्यास अतिरिक्त वितरण व्यवस्था या योजनेत समाविष्ट करण्यात यावी.

५. या योजनांद्वारे साठवणूक केलेल्या पाण्यास मर्यादा आहेत, त्यामुळे वितरण व्यवस्थेत कुठेही पाण्याची गळती होणार नाही याची काळजी घेणेत यावी. गावातील सर्व नळ जोडण्यांना तोट्या असल्याची खात्री करण्यात यावी. या गावे / वाड्यांमध्ये आवश्यकतेनुसार पाणी सोडणे व बंद करणे इत्यादीसाठीची नियमित यंत्रणा निर्माण करण्यात यावी आणि

ग्रामस्थांना पाण्याचा ताळेबंद, साठवणूक केलेले पाणी काटकसरीने वापरणे, पाणी वाया जाऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी या बाबत जनजागृती करण्यात यावी.

६. मेटॅलिक टँक पध्दतीच्या योजनांकरिताचे टाईप इस्टीमेट परिशिष्ट ५ मध्ये देण्यात आले आहे. योजनांचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील DSR चा वापर करण्यात यावा.

७. प्रशासकीय मान्यतेनंतर योजनांची अंमलबजावणी जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सुचनांनुसार करण्यात यावी. योजना अंमलबजावणीचा कालावधी ४ ते ६ महिन्यांपर्यंत स्थानिक परिस्थितीनुसार देण्यात यावा.

८. या उपक्रमानुसार हाती घ्यावयाच्या उपाय योजना या किमान २० लि. प्रति दिवस प्रति माणसी या क्षमतेच्या बांधण्यात याव्यात. मात्र या गावांमध्ये अस्तित्वातील योजना, भूजल बळकटीकरणाच्या योजना, स्त्रोत बळकटीकरणाच्या योजना पाण्याचे व्यवस्थापन इत्यादी उपाय योजना करुन ५५ लि. प्रति दिवस प्रति माणसी हा निकष साध्य होईल याची खबरदारी घ्यावी.

९. योजनेमध्ये पंप बसविण्याची आवश्यकता असल्यास प्राधान्याने सौर उर्जेवर आधारीत पंपाचा समावेश करण्यात यावा.

**पाणी गुणवत्ता तपासणी** -

झरा अथवा भूजल स्त्रोत असल्यास स्त्रोत निवडण्यापुर्वी व त्यानंतर त्यांची नियमित पाणी गुणवत्ता तपासण्यात यावी. साठणूक केलेल्या पाण्याची नियमित तसेच उन्हाळ्यात पाणी वितरीत करण्यापुर्वी पाणी गुणवत्ता तपासणी करण्यात यावी. प्रचलित पद्धतीप्रमाणे पाणी गुणवत्ता तपासणीसाठी पाण्याचे नमुने उपविभागीय प्रयोगशाळेत जलसुरक्षाकांमार्फत पोहचविण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची राहील. उपविभागीय प्रयोगशाळांनी नियमित पद्धतीने तपासणी करुन पाणी गुणवत्ता अहवाल ग्रामपंचायतीस निशुल्क उपलब्ध करुन द्यावा.

**योजनांची देखभाल दुरुस्ती** -

स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या योजना व्यवस्थित सुरु ठेवणे, साठवण टाकी नियमित भरणे, उपलब्ध पाण्याचा नियोजनबद्ध पद्धतीने वापर करणे व योजनांची देखभाल दुरुस्ती करणे इत्यादीची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची राहील. योजनेकरिता देखभाल दुरुस्तीचा खर्च कमी अपेक्षित असला तरीही, प्रचलित दरानुसार योजनेच्या देखभाल दुरुस्तीकरीता पाणी पट्टी वसुलीची तरतूद करण्यात यावी. योजनेच्या देखभाल दुरुस्ती

करीता स्थानिक पातळीवर पाणी व स्वच्छता समिती किंवा जलसुरक्षक यांची क्षमता बांधणी करण्यात यावी.

राबविण्यात आलेल्या योजना व्यवस्थित सुरु आहेत किंवा नाही, साठवण टाकी नियमित भरणे, उपलब्ध पाण्याचा नियोजनबद्ध पद्धतीने वापर व योजनांची देखभाल दुरुस्ती याबाबत तालुका स्तरावरुन नियमित आढावा घेण्यात यावा. त्याकरिता संबंधित तालुक्याचे गटविकास अधिकारी आणि उपविभागीय कार्यालयाचे उपअभियंता यांची या बाबींची नियमीत देखरेख करण्याची, आढांवा घेण्याची व ग्रामपंचायतींना आवश्यक ते मार्गदर्शन करण्याची जबाबदारी राहील.

**क्षमता बांधणी व जनजागृती -**

स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण कार्यक्रमांतर्गत उपाय योजना हाती घेण्यापुर्वी गावातील पाण्याचा ताळेबंद, स्रोत बळकटीकरण, भुजलावर पडणारा ताण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, साठवणूक केलेल्या पाण्याचा वापर व त्याचा काटकसरीने व नियोजनबद्ध पद्धतीने वापर इत्यादीबाबत जनजागृती करण्यात यावी.

या उपक्रमांतर्गत हाती घेण्यात आलेल्या व योजनांची अंमलबजावणी करण्यात आलेल्या गावांमध्ये योजनेची देखभाल दुरुस्ती, योजना व्यवस्थित सुरु ठेवणे, साठवण टाकी नियमित भरणे, उपलब्ध पाण्याचा नियोजनबद्ध पद्धतीने वापर, वितरित करण्यात येणाऱ्या पाण्याचे निर्जंतुकीकरण याकरिता ग्रामस्थांची, पाणी व स्वच्छता समिती सदस्यांची तसेच संबंधित जलसुरक्षक अथवा पाणी पुरवठा कर्मचारी यांची सातत्याने जन जागृती व क्षमता बांधणी करण्याची आवश्यकता आहे. याकरिता उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांनी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाद्वारे कार्यवाही करावी. या उपाययोजनांची देखभाल तसेच स्थानिक स्तरावर दुरुस्ती याकरीता संबधीत गावातील किमान २ ते ३ व्यक्तींना प्रशिक्षित करण्याची जबाबदारी अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेची राहील.

**योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधी -**

स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजनेंतर्गत प्रस्तावित योजनांच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावरुन जिल्हा परिषद यांना जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीतुन या योजनांच्या अंमलबजावणीचा खर्च करण्यात यावा.

जल जीवन मिशन कार्यक्रमाव्यतिरिक्त जिल्हा नियोजन समितीकडे असलेला निधी, वित्त आयोग, Corporate Social Responsibility (CSR) अंतर्गत उपलब्ध निधी अथवा इतर निधी उपलब्ध असल्यास त्याचा देखील या योजना राबविण्याकरिता वापर करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०५२०१२५९२८०२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chetan Balasaheb Nikam

Digitally signed by Chetan Balasaheb Nikam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=MAHARASHTRA, 2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, serialNumber=7268de40660971f80951c66d0e657e903b378196f51a978d2a366cf5eb564c0c, cn=Chetan Balasaheb Nikam
Date: 2021.05.20 14:32:08 +05'30'

**(चेतन निकम)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. विभागीय आयुक्त, प्रादेशिक विभागीय कार्यालय, कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपुर.
१०. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई.
११. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, शिवाजीनगर, पुणे.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व).
१३. मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. मिशन संचालक, जल जीवन मिशन, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
१५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
१६. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
१७. उपायुक्त (विकास), विभागीय विशेष सनियंत्रण कक्ष, विभाग कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर

१८. प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर
१९. उपमुख्य कार्यकारी आधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद, (सर्व).
२०. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व).
२१. जिल्हा वरिष्ठ भुवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणी विकास यंत्रणा, (सर्व).
२२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई.
२३. निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

# परिशिष्ट -१ मेटॅलीक पद्धतीच्या साठवण टाक्या


या योजनेमध्ये झिंक ॲल्युमिनियम पासून बनलेली मेटॅलीक पद्धतीची मुख्य साठवण टाकी उभारण्यात यावी. टाकीच्या आतील बाजूस फुडग्रेड लायनर लावण्यात यावे. पाण्याचा ताण असलेल्या गावाचा ताण असलेला कालावधी निश्चित करुन गावाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मुख्य साठवण टाकीची क्षमता निश्चित करण्यात यावी. टाकीमध्ये पाणी साठवून ठेवण्यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार पाऊस, झरा इत्यादी स्रोतांचा वापर करण्यात यावा. सर्व मेटॅलीक साठवण टाक्यांना, टाकीच्या छतावर पडणाऱ्या पावसाचे पाणी टाकीत साठविण्याचे प्रयोजन असावे. मुख्य साठवण टाकीपासून दैनंदिन वितरणासाठी पाईपलाईनद्वारे छोट्या प्लास्टीकच्या टाकीमध्ये पाणी सोडून तेथुन ते स्टँड पोस्ट अथवा घरगुती नळ जोडणीद्वारे वितरीत करावे. साठवूण ठेवलेले पाणी वितरण करतेवेळी निर्जंतुकीकरण करुन देण्यासाठी क्लोरीनेशनची व्यवस्था करण्यात यावी.


**योजनेचे डिझाईन :-**

अ) आवश्यकतेनुसार मुख्य स्रोतातुन गुरुत्व वाहिनी अथवा पंपिंग करुन पाणी मुख्य साठवण टाकी पर्यंत आणणे.

ब) मुख्य साठवण टाकी, ज्याची क्षमता ताण असलेल्या कालावधी नुसार निश्चित केली असेल त्या टाकीमध्ये पावसाचे किंवा झऱ्याचे पाणी (अथवा भूजल मुबलक उपलब्ध असेल (पावसाळ्यात व हिवाळ्यात) त्यावेळी) पाणी साठवून ठेवणे,

क) उन्हाळ्यात भूजल उपलब्ध नसल्यामुळे मुख्य साठवण टाकीत साठविलेले पाणी दैनंदिन वापराच्या टाकीतून गावातील जलसुरक्षक / बचत गट / लोकसहभागाच्या मदतीने प्रस्तावित निकषाप्रमाणे किमान २० लिटर प्रती दिवस प्रतीदिन उपलब्ध करुन देणे.






**योजनेचे फायदे -**

- योजनेच्या अंमलबजावणीसाठी अत्यंत कमी कालावधी लागतो.
- रस्ता नसलेल्या दुर्गम भागातील देखील योजनेची अंमलबजावणी केली जाऊ शकते.
- देखभाल दुरुस्तीचा खर्च अत्यंत कमी आहे.
- पाण्याची गुणवत्ता टिकून रहाते.
- आवश्यकता पडल्यास योजना इतरत्र हलविता येते.

# परिशिष्ट -२ फेरो सिमेंट किंवा आर.सी.सी. साठवण टाक्या

या योजनेमध्ये फेरो सिमेंट किंवा आर.सी.सी. पासून बनलेली सिमेंटची मुख्य साठवण टाकी उभारण्यात यावी. पाण्याचा ताण असलेल्या गावाचा ताण असलेला कालावधी निश्चित करुन गावाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मुख्य साठवण टाकीची क्षमता निश्चित करण्यात यावी. टाकीमध्ये पाणी साठवून ठेवण्यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार पाऊस, झरा इत्यादी स्रोतांचा वापर करण्यात यावा. सर्व सिमेंटच्या साठवण टाक्यांना, टाकीच्या छतावर पडणाऱ्या पावसाचे पाणी टाकीत साठविण्याचे प्रयोजन असावे. मुख्य साठवण टाकीपासुन दैनंदिन वितरणासाठी पाईपलाईनद्वारे छोट्या प्लास्टिकच्या टाकीमध्ये पाणी सोडून तेथून ते स्टँड पोस्ट अथवा घरगुती नळ जोडणीद्वारे वितरीत करावे. साठवुन ठेवलेले पाणी वितरण करतेवेळी निर्जंतुकीकरण करुन देण्यासाठी क्लोरीनेशनची व्यवस्था करण्यात यावी.

**योजनेचे डिझाईन :-**


अ) आवश्यकतेनुसार मुख्य स्रोतातून गुरुत्व वाहिनी अथवा पंपिंग करुन पाणी मुख्य साठवण टाकी पर्यंत आणणे.

ब) मुख्य साठवण टाकी ज्याची क्षमता टंचाई कालावधी नुसार निश्चित केली असेल त्या टाकीमध्ये पावसाचे किंवा झऱ्याचे पाणी (अथवा भूजल मुबलक उपलब्ध असेल (पावसाळ्यात व हिवाळ्यात) त्यावेळी) पाणी साठवुन ठेवणे.

क) उन्हाळ्यात भूजल उपलब्ध नसल्यामुळे मुख्य साठवण टाकीत साठविलेले पाणी दैनंदिन वापराच्या टाकीतून गावातील जलसुरक्षक / बचत गट / लोकसहभागाच्या मदतीने प्रस्तावित निकषाप्रमाणे किमान २० लिटर प्रती दिवस प्रती दिन उपलब्ध करुन देणे.


**योजनेचे फायदे -**

- दुर्गम डोंगराळ भागात योजनेची अंमलबजावणी केली जाऊ शकते.
- देखभाल दुरुस्तीचा खर्च कमी आहे.
- पाण्याची गुणवत्ता टिकून राहते.
- कमी खर्चाची उपाय योजना.



# परिशिष्ट ३ - जलकुंभ / कठीण खडकातील टाकी योजनेद्वारे पाणी पुरवठा योजना

उन्हाळ्यात पाणी कमी पडणाऱ्या व पाण्याचा ताण जाणवणाऱ्या गावांकरिता अशा प्रकारची योजना राबविली जाऊ शकते. या योजनेमध्ये गावातील अस्तित्वातील पाणी पुरवठ्याच्या विहिरीचे खोलीकरण व रुंदीकरण (१० ते २० मीटर) करुन आवश्यकतेनुसार जलकुंभ तयार केला जातो. विहिरीची खोली व रुंदी वाढविल्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी साठा उपलब्ध होतो. खोली वाढवताना कठीण खडकापर्यंत जाऊन त्यामध्ये किमान १ ते २ मीटर खुदाई करणे आवश्यक आहे. विहिरीचा वरचा भाग बांधुन घेणे आवश्यक असते. या जलकुंभातुन पंपिंगद्वारे घरगुती नळ जोडणीद्वारे वितरण व्यवस्था निर्माण केली जाऊ शकते. बाष्पीभवनामुळे व्यय होणाऱ्या पाण्याचा विचार करुन अतिरिक्त साठवणूक क्षमतेचा विचार करण्यात यावा. उन्हाळ्यात लगतच्या भागातील भूजल पातळी खालावल्यास जलकुंभातील भूजल कमी होऊन पुन्हा टंचाई जाणवू शकते, त्या करिता कठीण पाषाणात किमान २ मीटर पर्यंत खोली वाढविण्यात यावी. योजनेचे पाणी दूषित होऊ नये या करिता काळजी घेण्यात यावी. योजना प्रस्तावित करताना स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात.



**योजनेचे फायदे -**


- डोंगराळ भागात तसेच राज्यातील इतर भागात योजनेची अंमलबजावणी केली जाऊ शकते.
- घरगुती नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा केला जाऊ शकतो.
- कमी पर्जन्यमानाचे क्षेत्र असलेल्या भागात देखील अंमलबजावणी शक्य.

# परिशिष्ट ४ - साठवण तलाव / तळे

पाण्याचा ताण असलेल्या गावे / वाड्यांमध्ये व्यवहार्य असल्यास साठवण तलाव / तळे या योजना घेता येऊ शकतील. ताण असलेल्या कालावधीकरिता पाणी पुरवठा करण्यासाठी पावसाळ्यामध्ये पाणी साठवण तलावामध्ये साठवूण ठेवता येऊ शकेल. साठवण तलावासाठी मुबलक जागेची आवश्यकता लागणार आहे. साठवण तलावाचे आकारमान व आराखडा (design) गावाची लोकसंख्या, पाण्याचा ताण असलेला कालावधी, पाणी वितरणाचा दर, पर्जन्यमान, बाष्पीभवनाचा दर, भुस्तरीय रचना, टोपोग्राफी इत्यादीबाबींचे विश्लेषण करुन त्यानुसार निश्चित करण्यात यावे. तलावामध्ये साठवूण ठेवण्यासाठी पावसाच्या पाणी तसेच उपलब्ध असल्यास झरा अथवा नजिकच्या स्रोतातून पावसाळ्यात उपलब्ध होणाऱ्या भुजलाचा वापर करण्यात यावा. साठवण तलाव भरण्यासाठीची कार्यपद्धती निश्चित करण्यात यावी. जमिनीवरुन वाहून जाणारे पाणी या साठवण तलावात सोडण्यात येऊ नये. जमिनीवरुन वाहुन जाणाऱ्या पाण्यामुळे साठवूण ठेवलेले पिण्याचे पाणी दूषित होऊ शकेल. साठवण तलाव खुदाईसाठी नियोजन विभागामार्फत व राज्य फलोत्पादन मिशन द्वारे निर्गमित शेततळी बांधण्याबाबतच्या मार्गदर्शक सुचनांचा वापर करण्यात यावा.

साठवूण ठेवलेले पाणी पाझरु नये याकरिता साठवण तलावाच्या तळाशी व तटबंदीपर्यंत उत्तम प्रतीच्या पॉलीइथीलीन मटेरीयलचे आच्छादन टाकण्यात यावे. अशा प्रकारचे आच्छादन चांगल्या प्रतीचे असावे अन्यथा त्याची साठवलेल्या पाण्यासोबत प्रक्रिया होऊन त्याच्यामुळे देखील पिण्याचे पाणी दूषित होऊ शकेल. साठवण तलावातून मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होऊन साठवलेले पाणी कमी होत असते. बाष्पीभवन कमी करण्यासाठी उपलब्ध पद्धतींचा वापर करता येऊ शकेल. परंतु त्यामुळे पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता खराब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

साठवण तलावातून वितरण व्यवस्थेद्वारे पाण्याचा ताण असलेल्या कालावधीत पिण्याचे व घरगुती वापराचे पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे. त्या करिता अस्तित्वातील योजनेची उपांगे यांचा विचार करुन आवश्यकतेनुसार पाईपलाईन, वितरण टाकी, वितरण व्यवस्था इत्यादींचा समावेश योजनेत करण्यात यावा. पाणी वितरण करतेवेळी शुद्ध व निर्जंतुक करुन वितरण करण्यासाठी योग्य ती व्यवस्था करण्यात यावी.



## परिशिष्ठ – ५: Type Estimate for Metallic Tanks

**For Design, Construction and Commissioning of Zincalume Coated Steel Pre-Fabricated Ground Water Storage Bolted Tanks for Drinking Water, Gravity/Rising Mains, Online Chlorination and One day storage tank with taps and allied work in water stressed villages**

a) **Rainwater based and Spring based Metallic Tanks**

| Sr. No. | Scheme Component | Specifications | Unit | Size / Capacity / length | Rate As per DSR | Total Cost | Reference |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Main Metallic Tank | Supply and installation of Zincalume Coated Steel prefabricated ground water storage bolted tanks, a complete package in knockdown ready to assemble construction conforming to specifications in DSR for Zincalume Water Storage Tanks for Drinking Water (Including RCC foundation rate) | Per Lit | | | | |
| 2 | Daily Distribution Tank – Plastic (If required) | Daily Drinking Water tank - Providing and fixing 5000 litter H.D.P container Syntax or alike one piece moulded water tank made out of low density polythyler and built corrugation including of delivery up to destination hoisting and fixing of accessories such as inlet, outlet overflow of all tanks capacity including UCR masonry platform of height 1.5m, concrete flooring (M15), filling the plinth, soling and inlet & outlet pipe, specials & valve arrangement (minimum 3 taps) or with requisite MS structure frame including foundation, painting etc. | Per lit | | | | |
| 3 | Chlorination Unit | Supply and installation of non-electric, online automatic Water Chlorination unit to be fitted online in water supply schemes capable of providing up to 2 ppm chlorination conforming to Specifications for Online Automatic Chlorination System in Volume II, along with required pipe fittings and chlorine test kits | Per unit | | | | |

| Sr. No. | Scheme Component | Specifications | Unit | Size / Capacity / length | Rate As per DSR | Total Cost | Reference |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | Annual Maintenance of Chlorination Unit | Annual Maintenance and Operation and Maintenance of non-electric, online automatic Water Chlorination fitted online on water supply schemes, as mentioned in Item 6 above. (Rate to be valid for 5 years) | Rate/year | | | | |
| 5 | Pipeline | Supplying, lowering, laying, jointing and testing of ISI mark G.I. / HDPE pipe of following class and dia. Including all local and central taxes, octroi, inspection charges, transportation to stores, as per IS 1239/2004 including all specials, all types of valves, fittings excavation in all types of soil strata, refilling and in-casing as required...etc complete as directed by engineer incharge. | Rate / mtr | | | | |
| | | Pipeline from Spring to Main Tank (if applicable) (Gravity main) | Rate /mtr | | | | |
| | | Pipeline from Main Tank to Daily Distribution tank / Distribution System | Rate /mtr | | | | |
| | | Pipeline for Distribution System (If Required) | Rate /mtr | | | | |